२०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अनुदाने
६ शासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांना देण्यात यावयाच्या
अनुदानाचे वाटप. मागणी क्र. एल ३ , २४१५ - (०३) (०२)
मुख्य लेखाशिर्ष-२४१५ ०६२४. (तिसरा हप्ता)
(माहे डिसेंबर,२०१५ ते मार्च,२०१६)

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः अनुग्रा-२०१५/प्र.क्र.८२/योजना-४

बांधकाम भवन, तळ मजला, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
तारीखः ४ फेब्रुवारी,२०१६

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक प्रशिक्षण-२०९३/प्र.क्र. ८४५/०९, दि.१७.०९.१९९३.
२) शासन परिपत्रक क्रमांक- ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक प्रशिक्षण-११९९/प्र.क्र. ५८१/६१, दि.२३.९.९८.
३) शासन परिपत्रक क्रमांक- ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र. ८५९/४४, दि.१२.०६.२००१.
४) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक अनुग्रा २०१५/प्र.क्र.८२/योजना-४, दि.८ मे,२०१५.
५) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक अनुग्रा २०१५/प्र.क्र.८२/योजना-४, दि.१३ जुलै,२०१५.
६) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक अनुग्रा २०१५/प्र.क्र.८२/योजना-४, दि.५ नोव्हेंबर,२०१५.

प्रस्तावना

सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरीता मुख्य लेखाशिर्ष मागणी क्र. एल ३ "२४१५ - (०३) (०२) ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, संकेतांक क्रमांक २४१५ ०६२४" ३१ सहायक अनुदान (वेतनेतर), ३६ सहायक अनुदान (वेतन) या लेखाशिर्षाखाली ग्राम सेवक प्रशिक्षण केंद्र, मांजरी (जि. पुणे), कसबाबावडा, (जि.कोल्हापूर), जालना, परभणी, बुलढाणा व सिंदेवाही (जि. चंद्रपूर) यांना वेतनेतरकरिता रु. ६०,००,०००/- व वेतनासाठी रु. ४,५५,८०,०००/- असे एकूण रु. ५,१५,८०,०००/- इतकी तरतूद अर्थसंकल्पित केली आहे.

२. ६ शासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांना सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता पहिला हप्ता

म्हणून एप्रिल व मे,२०१५ या दोन महिन्या करिता वेतनेतरसाठी रु. १०,००,०००/- व वेतनासाठी रु. ५९,१२,०००/- असे एकूण रु.६९,१२,०००/- इतके अनुदान दिनांक ८ मे,२०१५ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आले आहे. तसेच, माहे जून ते नोव्हेंबर,२०१५ या सहा महिन्याकरिता वेतनेतरकरिता रु.३०,००,०००/- व वेतनाकरिता रु.१,४४,०१,०००/- असे एकूण रुपये १,७४,०१,०००/- इतके अनुदान दिनांक १३ मे,२०१५ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आले आहे. त्यानंतर दिनांक ५ नोव्हेंबर,२०१५ च्या शुध्दीपत्राकान्वये दुसरा हप्ता म्हणून माहे जून ते नोव्हेंबर,२०१५ या सहा महिन्याकरिता वेतनेतरकरिता रु.३०,००,०००/- व वेतनाकरिता रु.१,६२,२२,०००/- असे एकूण रुपये १,९२,२२,०००/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. आता माहे डिसेंबर,२०१५ ते मार्च,२०१६ या कालावधीकरीता वेतनेतरसाठी रु.११,००,०००/- व वेतनासाठी रु. ९८,२२,०००/- असे एकूण १,०९,२२,००० इतके अनुदान ६ शासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांना या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात येत आहे.

३. सदर अनुदान विहित अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे वितरित करण्यात येत आहे. सदर तरतूद सर्व संबंधित विभागीय आयुक्त यांच्या अधिनस्त ठेवण्यात येत आहे.

४. प्रशिक्षण केंद्राना अनुदान द्यावयाच्या कार्यपध्दतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक प्रशिक्षण ११९८/प्र.क्र.५८१/६१, दिनांक २३ सप्टेंबर १९९८ व शासन परिपत्रक क्र. प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र.८५९/४४, दि. १२ जून, २००१ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने सर्व संबंधित उपायुक्त (आस्था) यांनी सदर संस्थेस अनुदान अदा करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी. तसेच संदर्भ १ येथे दर्शविलेल्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १२ मधील अटीनुसार केंद्रानी खर्च करावा.

५. हा खर्च मागणी क्र.एल ३,"२४१५, कृषि विषयक संशोधन व शिक्षण" (पी) (०३) (०२) ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र संकेतांक क्र. (२४१५ ०६२४) ३६, सहाय्यक अनुदाने (वेतन) व ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो या लेखाशीर्षातंर्गत केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा तसेच सदर खर्च त्याच संकेतांकाखाली खर्च पडतो आहे, त्याबाबतचा ताळमेळ घेऊन त्याबाबत खातरजमा करुन शासनास कळविण्याबाबत विभागीय आयुक्तांनी संबंधितांना सूचना द्याव्यात.

६. विभागीय आयुक्त कार्यालयाने ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांना अनुदान वितरीत करताना वेतन व वेतनेतर बाबीवर प्रत्यक्ष किती अनुदानाची आवश्यकता आहे याची खातरजमा करुन त्यांना आवश्यक तेवढी रक्कम उपलब्ध करुन द्यावी. मात्र सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या अनुदानापेक्षा जास्त

अनुदान वितरीत केले जाणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच ग्रामसवेक प्रशिक्षण केंद्रांनी वेतनाकरिता दरमहा किती अनुदान आवश्यक आहे. याची पूर्वसूचना संबंधित आयुक्त कार्यालयास द्यावी. त्याप्रमाणे आयुक्त कार्यालयाने वेतनाकरिता अनुदान वितरीत करावे. आवश्यक असलेल्या अनुदानाबाबत पूर्वसूचना न दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित केंद्रांच्या प्राचार्यांची असेल.

७. या अनुदानातून संबंधित प्रशिक्षण केंद्राने केलेल्या खर्चाचे स्वंतत्र लेखे व पुस्तके तपासण्याचा अधिकार महालेखापाल, (लेखा) महाराष्ट्र-१ मुंबई आणि/किंवा महालेखापाल (लेखा) महाराष्ट्र-२ नागपूर यांना राहील व त्यांना त्यांचे हे काम योग्यत-हेने पार पाडता यावे म्हणून संबंधित प्रशिक्षण केंद्र / संस्था, मदत/ सुविधा पुरवतील.

८. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ भाग १ ला, उपविभाग १ ते ५ मधील तरतूदीनुसार शासन निर्णय दिनांक १५/५/२००९ सोबतच्या उप विभाग - ३ मधील अ.क्र. १ परि. १६२, १६३, १६४ नुसार प्रशासकिय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांचा वापर करून तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१२ जानेवारी,२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१२४२४३९०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Mahadev Gengaje

Digitally signed by Rajendra Mahadev Gengaje
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Rajendra Mahadev Gengaje
Date: 2016.02.06 11:43:34 +05'30'

(रा.म. गेंगजे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. विभागीय आयुक्त, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद (प्रत्येकी२ प्रती)
२. उप आयुक्त (आस्था) विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद.
३. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे, कोल्हापूर, बुलढाणा, जालना, परभणी, चंद्रपूर
४. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१, मुंबई
५. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर

६. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, बाणेर रोड, पुणे
७. उपमहासंचालक राज्य ग्रामीण विकास संस्था (यशदा) बाणेर रोड, पुणे
८. वित्त विभाग, कार्यासन क्र. अर्थसं-१७/व्यय-१५
९.प्राचार्य,ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, मांजरी फार्म, पुणे/कसबा बावडा, कोल्हापूर जालना/ परभणी/ सिंदेवाही / चंद्रपूर/बुलढाणा
१०. कार्यासन क्र. वित्त-१, वित्त-६, वित्त-७, वित्त-८ ग्राम विकास व जलसंधारण विभाग (२ जादा प्रतींसह)
११. निवड नस्ती का. क्र. योजना-४, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

परिशिष्ट

शासन निर्णय क्र.अनुग्रा-२०१५/प्र.क्र.८२/योजना-४,दि. जानेवारी,२०१६				
डिसेंबर,२०१५ ते मार्च,२०१६ या कालावधीतील तिसऱ्या हप्त्याचे वितरण (रु. लक्षात)				
अ.क्र.	ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राचे नाव	वेतनेतर	वेतन	एकूण
१	मांजरी फार्म, पुणे	१.८३	१४.७६	१६.५९
२	कसबा बावडा, कोल्हापूर	१.८३	२०.००	२१.८३
अ	**विभागीय आयुक्त, पुणे**	**३.६६**	**३४.७६**	**३८.४२**
३	जालना	१.८३	२३.७८	२५.६१
४	परभणी	१.८३	२२.९९	२४.८२
ब	**विभागीय आयुक्त, औरंगाबाद**	**३.६६**	**४६.७७**	**५०.४३**
५	सिंदेवाही, चंद्रपूर	१.८३	११.३९	१३.२२
क	**विभागीय आयुक्त, नागपूर**	**१.८३**	**११.३९**	**१३.२२**
६	बुलढाणा	१.८५	५.३०	७.१५
ड	**विभागीय आयुक्त, अमरावती**	**१.८५**	**५.३०**	**७.१५**
	एकूण (अ+ब+क+ड)	**११.००**	**९८.२२**	**१०९.२२**